

शैक्षणिक संदर्भ अंक १२३ एप्रिल-मे २०२०



# उल्कापिंड

## भाग २

लेखक : जॉन विंडहम        अनुवाद : यशश्री पुणेकर



# उल्कापिंड

## भाग २


**लेखक- जॉन विंडहम     अनुवाद- यशश्री पुणेकर**

*फोर्टा ग्रहावरचे प्रगत जीव गोलाकार अवकाशयानांतून अंतराळसफरीला निघाले. नव्या ग्रहांवर नव्याने सुरूवात करायची, तिथल्या आधीच्या रहिवाशांबरोबर ज्ञानाची देवाणघेवाण करायची, आणि एक आदर्श अधिक चांगले जग निर्माण करायचे, अशा उदात्त हेतूने हा प्रवास सुरू झाला. ऑन व त्याचे सहकारी असलेले गोलाकार यान पृथ्वीवर येऊन थडकले. इथल्या लोकांना तो एक उल्कापिंड वाटला. पण उल्कापिंडाच्या आतून येणारे आवाज, एका मांजरीचा मृत्यू अशा गूढ घटनांमुळे लोकांना वेगळ्या शंकाही येऊ लागल्या... काय झाले पुढे?*

### ऑनच्या डायरीतून

*ही तर भयानक जागा आहे.  आम्हाला अपेक्षित असलेला सुंदर निळा ग्रह हाच आहे का? आजपर्यंत पूर्ण ब्रह्मांडात आमच्याइतकी अधिक विकसित कोणीच प्रजाती नाहीये पण इथे तर आम्हीसुद्धा आमच्या भोवती फिरणाऱ्या भयानक राक्षसांना बघून हादरलो आहोत. आम्ही एका अंधाऱ्या गुहेत होतो. आधी आम्ही हजारजण होतो. आता नऊशे चौसष्ट राहिलो आहोत. बाकीचे कसे गेले ते सांगतो.*

*गोलकातून बाहेर पडण्यासाठी रस्ता साफ करणारं मशीन बंद झालं होतं. आम्ही सगळे सरपटत आपापल्या कक्षातून बाहेर गोलकाच्या मधल्या जागेत एकत्र जमलो. आमचे नेते सुन्स यांनी एक छोटं भाषण दिलं. अपरिचित जगात पाऊल ठेवताना धैर्याने काम करायला हवं याची त्यांनी आम्हाला आठवण करून दिली. आपण भविष्याची बीजं आहोत आणि आपल्यावर फोर्टाला पुढे उभारण्याची जबाबदारी आहे. त्या लांबचलांब रस्त्यावरून आम्ही गोलकाच्या बाहेर पडलो.*



*मी या भयावह जगाचं वर्णन तरी कसं करू? ही अगदी उदासवाणी आणि अंधारी जागा आहे. खरंतर आता काही रात्र नाही, पण अंधार आहे. थोडाफार उजेड आकाशात लटकलेल्या एका मोठ्या वस्तूतून येत होता. दोन उभ्याआडव्या काळ्या पट्ट्यांनी ती वस्तू चार भागात विभागली गेली होती.*

*एका मोठ्या रुंद सपाट मैदानावर आम्ही उभे होतो. असं मैदान तर मी कधीच बघितलं नव्हतं. आम्हाला कुठल्याच बाजूनं त्याची दुसरी कड दिसतच नव्हती. सरळ, अंतहीन आणि समांतर एकाच दिशेने जाणाऱ्या रस्त्यांनी ते मैदान बनवलं होतं. (मी यांना रस्ते म्हणतोय कारण ते रस्त्यासारखे दिसतायत पण प्रत्येकच रस्ता इतका रुंद होता... मी कधीच इतके रुंद रस्ते पहिले नाहीत.) माझ्या उंचीइतक्या रुंद अशा फटींनी ते रस्ते विभागले गेले होते.*

*माझ्या शेजारचा म्हणाला की आपण सूर्याची किरणे सरळ पडणाऱ्या जगात आलो आहोत. मी त्याला म्हणालो की काहीही बरळू नकोस. पण जे काही दिसत होतं ते माझ्या आकलनशक्तीच्या बाहेरचं होतं.*

अचानक आम्हाला एक मोठा आवाज ऐकू आला आणि आम्ही आवाजाच्या दिशेने बघितलं. एक मोठा चेहरा गोलकाच्या मागून आमच्याकडे बघत होता. तो आमच्यापेक्षा खूपच उंच आणि काळा होता. त्याचे दोन टोकदार कान मिनारांसारखे दिसत होते आणि डोळे तर खूपच मोठे होते. जेव्हा तो राक्षस गोलकाच्या बाजूने आमच्या समोर आला तेव्हा आम्ही त्याचे पाय बघितले. मोठे मोठे –खांबासारखे!

त्याला बघून आम्ही इतके घाबरलो की पळण्यासाठी मागे वळू लागलो. मग तो राक्षस



विजेच्या वेगाने पुढे आला. लांब, अणकुचीदार नखं असलेल्या मोठ्या काळ्या पंजाने त्याने आमच्यावर वार केला. जेव्हा त्याने पंजा उचलला तेव्हा आमचे वीस लोक त्याच्या हाताखाली दबून खलास झाले होते. जमिनीवर त्यांचे ठसे मात्र उरले होते. पंजा पुन्हा खाली आला तेव्हा आमचे अजून अकरा जण मारले गेले. आमचे नेते सुन्स पळत पळत पुढे आले आणि त्या राक्षसाच्या दोन्ही पायांच्या मध्ये उभे राहिले. त्यांची बंदूक त्यांच्या हातात होती. त्यांनी बरोबर नेम धरून गोळी मारली. मला वाटलं एवढ्या मोठ्या राक्षसावर या हत्याराचा काय उपयोग होणार? पण सुन्स माझ्यापेक्षा जास्त हुशार आणि समजूतदार होते. अचानक त्या राक्षसाचं डोकं वर उचललं गेलं आणि धडामकन ते मोठं शरीर खाली कोसळलं आणि मरून गेलं. आणि सुन्स त्याच्या खालीच होते. खूप शूर होते ते!

मग आम्ही इस्स यांना आमचा नेता म्हणून निवडलं. त्यांनी निर्णय घेतला की आपल्याला लवकरात लवकर सुरक्षित जागा शोधली पाहिजे. जेव्हा आपल्याला अशी जागा

*मिळेल तेव्हा गोलकातून आपण आपले दस्तावेज, यंत्र आणि उपकरणं बाहेर काढू. ते आम्हाला त्या रुंद रस्त्यांपैकी एकावर घेऊन जाऊ लागले.*

*बरंच दूर गेल्यावर एका उभ्या टेकडीच्या पायथ्यापाशी आम्ही पोचलो. जिथे आम्ही उभे होतो तिथे समोरच एक उंच सरळसोट उंच टेकडी होती. तिचा पृष्ठभाग अगदी एकसारख्या दिसणाऱ्या दगडांनी बनलेला होता. त्या टेकडीच्या खालून चालता चालता आम्हाला एक गुहा सापडली. टेकडीच्या दोन्ही बाजूने आत आत खूप खोलवर गेली होती. गुहेचा आकार आणि उंची एकदम एकसारखी होती. म्हणजे सरळ रेषांच्या जगाबद्दल बोलणारा अगदीच काही वेडा नव्हता. असो, गुहेत आम्ही सुन्सना मारणाऱ्या कोणत्याही राक्षसापासून सुरक्षित राहू शकत होतो. गुहा इतकी निमुळती आहे की त्याचे मोठे पंजे आत येऊच शकणार नाहीत.*

*यानंतर एक अगदी विचित्र घटना घडली. आमचा गोलक कुठेतरी गायब झाला. त्या गुहेची तपासणी करायला इस्स काही जणांना घेऊन गुहेच्या आत गेले होते. जाताना आम्हाला गोलकावर लक्ष ठेवायला आणि त्याचं रक्षण करायला सांगून गेले. गुहेच्या दारात आम्ही उभे होतो तिथून गोलक आणि त्याच्याजवळ मरून पडलेला तो राक्षस आम्हाला दिसत होते. मग एक अजब घटना घडली. अचानक ढग गडगडल्यासारखा आवाज झाला. आणि आमच्या जवळच्या सगळ्या गोष्टी हलू लागल्या. एक विशाल वस्तू मेलेल्या राक्षसापाशी आली आणि त्याला उचलून आमच्या नजरेसमोरून दूर घेऊन गेली. हे सगळं काय चाललंय मला समजतंच नव्हतं, आमच्यापैकी कोणालाच कळत नव्हतं. मी फक्त त्या घटना कशा कशा घडल्या हे नीट सांगू शकेन.*

*आणि यानंतर जे सगळ्यात वाईट घडू शकत होतं ते घडलंच.*

*पुन्हा मैदान हादरू लागलं. मी गुहेच्या बाहेर जे बघितलं त्यावर माझा अजूनही विश्वास बसत नाही. चार खूप मोठे प्राणी, इतके मोठे की पहिला राक्षस त्यांच्यापुढे काहीच नाही, आमच्या गोलकाकडे आले. मला माहितीय की कोणी विश्वास ठेवणार नाही, पण ते लोक आमच्या विशालकाय गोलकापेक्षा तिप्पट चौपट उंच होते. ते गोलकापाशी खाली वाकले, त्यांच्या पुढच्या पायांनी अविश्वसनीयरित्या त्या जडशील भारी धातूच्या चेंडूला त्यांनी जमिनीवरून उचललं. परत जमीन आणखीनच जोरात हादरू लागली आणि ते वजन घेऊन ते प्राणी बाहेर पडले.*

*आम्ही आमच्या गोलकापासून दुरावलो. आमच्या सगळ्या मौल्यवान वस्तू त्याच्यात होत्या. आता आमच्याकडे नवीन जग निर्माण करण्यासाठी काहीच शिल्लक राहिलेलं नाही. इतकी मेहनत करून इतक्या दूर आल्यानंतर आम्हाला हे पाहावं लागतंय.... अतिशय त्रासदायक आहे हे!*

*पण अजून पुढे आणखीनच दु:ख सहन करायचं होतं. इस्स बरोबर गेलेल्या समूहातील दोघांनी येऊन भयंकर गोष्ट सांगितली. गुहेच्या मागच्या बाजूला त्यांना पुष्कळ रुंद बोगदे सापडले होते. ते कोणत्यातरी अज्ञात प्राण्यांच्या घाणीने आणि दुर्गंधीने भरलेले होते. जेव्हा आमचा गट त्या बोगद्यातून गेला, तेव्हा त्यांच्यावर काही सहा पाय व काही आठ पायांच्या, भीतीदायक प्राण्यांनी हल्ला केला. त्यापैकी बरेच आकारात खूप मोठे होते आणि त्यांची नखे आणि दात मोठे होते. तथापि, हे भयानक दिसणारे प्राणी हुशार नव्हते, म्हणून आमच्या फायर-ट्यूबने त्यांचा त्वरित जीव घेतला. इस्सना बोगद्यांच्या मागे एक मोकळं मैदान दिसलं. त्यांनी परत येऊन आम्हाला तिथे घेऊन जायचं ठरवलं. तेवढ्यात पुढची भयानक घटना घडली. आमच्या गटावर पहिल्या राक्षसाच्या आकाराच्या राखाडी रंगाच्या क्रूर प्राण्यांनी*

*हल्ला केला. हे प्राणी बहुतेक या बोगद्यांचे बांधकाम करणारे होते. आमचा गट आणि त्यांच्यात भयंकर युद्ध झाले आणि त्यात जवळपास आमचे सर्व जण मारले गेले. पण शेवटी आम्ही त्यांना हरवलं. आमच्यातले जे दोघेजण वाचले त्यांनी येऊन ही वाईट बातमी दिली.*

*आता आम्ही  म्यूइन यांना आमचा नेता मानलं आहे. त्यांनी ठरवलं की आपण बोगद्यातून जाऊन त्या मोकळ्या मैदानावर पोहोचू. आमचं मागचं मैदान तर रिकामं झालं होतं. आमचा गोलकही तिथे राहिला नव्हता. तिथेच राहिलो असतो तर उपाशी मरायची वेळ आली असती. आम्ही देवाकडे प्रार्थना करतोय की बोगद्यांच्या मागे आम्हाला चांगलं जग मिळूदे. या जगासारखं वेडसर आणि दुष्ट जग नको. ही काय फार मोठी इच्छा आहे का? आपलं काम करणं, जीवन शांततेत घालवणं आणि आपलं एक छोटं जग निर्माण करणं....*

**$$$**

दोन दिवसांनी ग्राहम पुन्हा सॅली आणि तिच्या बाबांना भेटायला आला. “मला वाटलं की तुम्हाला त्या उल्कापिंडाबाबत ताजी बातमी सांगावी,” तो म्हणाला. “युद्ध कार्यालयाच्या तज्ज्ञांच्या मते ते नेमकं काय आहे?” मि. फॉटेनने विचारलं.

“त्यांना पण माहिती नाही,” ग्राहम म्हणाला. “पण हा उल्कापिंड नाही हे ते निश्चितपणे सांगतायत. आधी तर त्यांना वाटलं की हा एखाद्या अनोळखी धातूचा भरीव चेंडू असेल मग त्यांना त्यात एक  गुळगुळीत एकसारखं छिद्र दिसलं. हे छिद्र जवळजवळ एक सेंटीमीटर रुंद आणि चेंडूच्या मधोमध आहे. ते छिद्र किती आतपर्यंत पोचलंय हे बघण्याकरता त्यांनी चेंडू कापण्याचा निर्णय घेतला.” “आणि काय दिसलं?”  सॅलीने विचारलं.

ग्राहम म्हणाला, “तो चेंडू भरीव नव्हता. त्याचं बाहेरचं पंधरा सेंटीमीटरचं आवरण एका कठीण धातूचं होतं. त्याच्या आत तीन/चार सेंटीमीटर रुंद मऊ चुऱ्याचं आवरण होतं.

आतल्या भागाचं उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी हे चुऱ्याचं आवरण. हे काम ते आवरण इतकं चोखपणे करत होतं की युद्ध कार्यालयाच्या तज्ञांना खूप आश्चर्य वाटलं. त्यांच्याकडे पण इतकी उत्तम गोष्ट नव्हती.''

''त्याच्या आत एक पातळ धातूचं आवरण होतं. त्याच्या आत एका नाजूक,नरम पदार्थानी बनलेल्या,एकेमेकांना चिकटून असलेल्या छोट्या छोट्या पिशव्या होत्या. त्या पिशव्यांमध्ये काहीच नव्हतं. मग धातूची पाच सेंटीमीटर आकाराची छोट्या छोट्या भागात विभागलेली पट्टी दिसली. त्यात विविध प्रकारच्या गोष्टी होत्या. छोट्या छोट्या ट्यूब, बियांची पाकिटं,आणि विविध पावडरी. चेंडू कापल्यावर हे सगळं सामान बाहेर आलं. शेवटी चेंडूच्या मध्यभागी धातूच्या अतिशय पातळ आणि सपाट स्तरांनी बनलेली दहा सेंटीमीटरची एक अगदी रिकामी जागा होती. असं होतं ते रहस्यमय हत्यार! युद्ध कार्यालयाचे लोक निराश झाले कारण त्यातून काहीच स्फोट झाला नाही. आता ते आपसात चर्चा करतायत की अशा गोष्टीचा नेमका काय उपयोग असू शकतो? तुम्हाला यातलं काही माहिती असेल तर त्या लोकांना ते जाणून घ्यायला नक्कीच आवडेल.''



''हे खूपच निराशाजनक आहे,'' मि. फॉटेन म्हणाले. ''जोपर्यंत ते फुरफुरणं ऐकलं नव्हतं, तोवर मला तो उल्कापिंडच वाटत होता.''

''एका तज्ञाच्या मते तो एखादा कृत्रिम उल्कापिंड असू शकतो. पण दुसरे तज्ञ याच्याशी सहमत नाहीत. त्यांच्या म्हणण्यानुसार कोणतीही गोष्ट अंतराळात पाठवली जाते तेव्हा त्याचा

एखादा उद्देश आपण समजू शकतो. पण धातूच्या या रिकाम्या चेंडूला अवकाशात कोणी आणि का सोडले असेल,काही समजत नाही.''

''कोणत्याही रहस्यमय हत्यारापेक्षा आपल्याकडे सहल करायला आलेल्या या



कृत्रिम उल्कापिंडाची गोष्ट जास्त रोमांचक आहे,'' सॅली म्हणाली. ''यातून आपणही एक दिवस अंतराळाची सफर करू शकतो अशी आशा निर्माण होते. किती अद्भुत असेल ना ती सफर! युद्धाचा, संहारक शस्त्रांचा, क्रूरतेचा तिरस्कार करणारे लोक एखाद्या साफ स्वच्छ ग्रहावर निघून जाऊ शकतील. आपण एखाद्या विशाल अंतराळ यानात बसून नव्या ग्रहावर उडून जाऊ आणि तिथे एक नवीन जीवन सुरु करू. या जगाला अधिकाधिक वाईट बनवणाऱ्या सगळ्या गोष्टी आपण इथेच सोडून जाऊ. आपल्याला फक्त अशी जागा हवी, जिथे लोक जगतील, काम करतील, काहीतरी निर्माण करतील आणि आनंदी असतील. आणि जर आपण पुन्हा सुरुवात करू शकलो तर आपण एका सुंदर, शांतीपूर्ण जगात निवांत जगू शकतो… ''

अचानक कुत्र्याच्या ज़ोरज़ोरात भुंकण्याच्या आवाजाने ती बोलायची थांबली आणि चटकन उठून उभी राहिली. भुंकण्याच्या ऐवजी आता कण्हण्याचा आवाज येऊ लागला. ''हा तर माझ्या मिटीचा आवाज़ आहे,'' सॅली घाबरून म्हणाली, ''काय झालं...?'' ती पळतच घराबाहेर आली. मि. फॉटेन आणि ग्राहम पण तिच्यामागे पळाले. सॅलीला छोटी, पांढरीशुभ्र मिटी आउटहाउसच्या भिंतीपाशी गवतावर पडलेली दिसली. ती तिला हाक मारत तिकडे धावली पण मिटी निपचित पडली होती.

“आई गं, बिच्चारी मिटी,” सॅली म्हणाली. “मला वाटतं ही मेलीय!” ती  मिटीच्या जवळ गुडघे टेकून बसली. “खरंच मेलीय ही!” ती म्हणाली. “पण असं कसं झालं.... काय झालं तिला ...” अचानक ती उठून उभी राहिली. तिने हाताने स्वतःचा पाय घट्ट पकडला “मला काहीतरी चावलंय. अरे, खूप दुखतंय,” वेदनेने तिच्या डोळ्यात पाणी आलं. आणि ती जोरात पाय चोळू लागली.

“हे काय होतंय ...?” मिटीकडे बघत बाबा म्हणत होते, तेवढ्यात ते म्हणाले, “हे काय आहे? मुंग्या?” ग्राहमने खाली वाकून बघितलं. “नाही, मुंग्या नाहीत या,” तो म्हणाला. “मला माहिती नाही काय आहे पण मुंग्या नाहीत.”



त्याने नीट बघण्यासाठी त्यातल्या एका छोट्या किड्याला उचललं.

विचित्रच किडा होता तो! चेंडूच्या आकाराची गोलाकार पाठ होती आणि पोटाकडे सपाट होता. पाठीकडचा भाग गुलाबी आणि चमकदार होता. त्याचे छोटे छोटे चार पाय होते. डोकं धडापासून वेगळं नव्हतं. खरंतर डोकं असं काही नव्हतंच. शरीरावरच एका बाजूला जिथे वरचा आणि खालचा भाग जोडलेला होता तिथं दोन डोळे होते. ते त्या किड्याचं निरीक्षण करतच होते तेवढ्यात तो किडा मागच्या दोन पायांवर उभा राहिला. त्याच्या पोटाचा फिकट पिवळा भाग दिसत होता. त्याने पुढच्या दोन पायांमध्ये एक गवतासारखी दिसणारी पातळ तार धरली होती.

ग्राहमच्या हाताला अचानक तीव्र वेदना होऊ लागली. “अरे रे!” त्या किड्याला हातावरून झटकत तो ओरडला. “हा छोटा किडा किती जोरात चावतोय! कोणता किडा आहे काय माहिती पण घराच्या बागेत हा असणं धोकादायक वाटतंय मला. आपल्याकडे किडे मारायचं औषध आहे का?” त्यानं विचारलं.

“हो, स्वयंपाकघरात एक डबा आहे बघ. त्यावर लिहिलंय,” बाबांनी सांगितलं. ग्राहम पळतच आत गेला आणि कीटकनाशकाचा डबा घेऊन आला. त्याने सगळीकडे बघितलं तर ते छोटे छोटे शेकडो किडे आउटहाउसच्या भिंतीवर रांगत चालले होते. एकदा डबा नीट हलवून त्याने त्यातली पावडर त्या किड्यांवर फेकली. ते त्या किड्यांकडे बघत राहिले. आता त्यांचा वेग कमी कमी होत चालला होता. काहीजण पाठीवर पडले आणि दुबळेपणाने हातपाय हलवत होते. नंतर ते एकदम शांत झाले.

“आता आपल्याला त्यांचा काही त्रास होणार नाही,” ग्राहम म्हणाला. “किती छोटे, पण किती भयानक होते! मी असे किडे कधीच पाहिले नव्हते. कुठून आले काय माहीत?”

*हिंदी शैक्षणिक संदर्भ १२२ मधून साभार.*

**§§§**

---

लेखक: **जॉन विंडहम**, प्रसिद्ध इंग्लिश विज्ञानकथा लेखक.

हिंदी अनुवाद: **भरत त्रिपाठी**, एकलव्य, भोपाळ समूहात सहभागी.

चित्रे: **सौम्या मेनन**, चित्रकार आणि ॲनिमेशन फिल्मकार.

मराठी अनुवाद: **यशश्री पुणेकर**, संदर्भ गटात सहभागी.

इमेल - yashashreegpunekar@gmail.com